# एईएमएल-टीच्या आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या मध्यावधी आढावा याचिकेचा सारांश

**१. परिचय**

माननीय आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय दर) नियमन, २०१९ (यापुढे "एमवायटी विनियम, २०१९" म्हणून संदर्भित) १-८-२०१९ रोजी जारी केले. हे नियम आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत लागू असतील. एमवायटी नियमन, २०१९ च्या नियमन ५.१ (ब) मध्ये मध्यावधी आढावा (एमटीआर) याचिका दाखल करण्याची तरतूद आहे :

- आर्थिक वर्ष २०१९-२० चे अचूक समायोजन एमईआरसी (बहु वार्षिक दर) नियमन, २०१५ अंतर्गत केले जाणार आहे.
- आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चे प्रस्तावित अचूक समायोजन एमवायटी नियमन, २०१९ अंतर्गत आहे.
- आर्थिक वर्ष २०२२-२३ चे प्रस्तावित अचूक समायोजन एमवायटी नियमन, २०१९ अंतर्गत आहे.
- एकूण आवश्यक महसूलाचा सुधारित अंदाज (एआरआर), विद्यमान दर आणि शुल्कापासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसूल तफावत आणि नियंत्रण कालावधीच्या चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी प्रस्तावित श्रेणीनुसार दरपत्रक.

एईएमएल-टी ने वरीलनुसार एमटीआर याचिका दाखल केली आहे

**२. आर्थिक वर्ष २०१९-२० चे अचूक समायोजन**

एईएमएल-टी कंपनी भांडवली खर्च, महसुली खर्च आणि महसूल उत्पन्न संदर्भात अचूक समायोजनाच्या हेतूने आर्थिक वर्ष २०१९-२० मधील तत्थ्य सादर करत आहे.

**२.१ भांडवली खर्च आणि भांडवल**

भांडवली खर्च आणि भांडवल पुढील प्रमाणे आहे :

**तक्ता क्र. १ : आर्थिक वर्ष २०१९-२० साठी भांडवल**

| तपशील / (रु.. कोटी) | आयडीसीसह भांडवल (एमवायटी आदेश) | आयडीसीसह भांडवल (प्रत्यक्ष) |
|---|---|---|
| डीपीआर | ३१६.३३ | २७४.२९ |
| बिगर डीपीआर | ३३ | २४.२८ |
| **एकूण** | **३४९.३३** | **२९८.७३** |

**२.२ आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एआरआर निर्धारासाठी मानक**

अ. घसारा : गणना एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार.

ब. कर्ज भांडवलावरील व्याज : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार, वास्तविक कर्ज पोर्टफोलिओच्या आधारे भारित सरासरी व्याजदर आणि चक्रवाढ व्याजदर हा विचारात घेतलेल्या वर्षादरम्यानचा आहे.

क. समभागावरील परतावा : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार गणना.

ड. परिचलन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार, नियामक खर्च आणि त्यावर मिळणाऱ्या निव्वळ हक्काच्या तुलनेत वास्तविक खर्च.

इ. कार्यरत भांडवलावरील व्याज (आयओडब्ल्युसी) : वास्तविक व्याजाची तुलना ही मानक व्याज (नियमित खेळते भांडवल आणि एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार व्याज दर विचारात घेऊन) आणि त्यावर मिळणाऱ्या निव्वळ हक्काशी केली जाते.

फ. आकस्मिक राखीव योगदान : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार गणना.

ग. प्राप्तीकर : पारेषण व्यवसायासाठी, करपूर्व नफा (पीबीटी) निर्धारित करण्याच्या स्वतंत्र नियामकाच्या मंजूर पद्धतीवर मंजूर प्राप्तीकर आधारित आहे.

ह. बिगर दर उत्पन्न (एनटीआय) : वास्तविकतेनुसार - तथापि - याचिकेत तपशीलवार नमूद केले त्याप्रमाणे काही घटक मानले गेले नाहीत.

ई. इतर व्यवसायातील उत्पन्न : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार गणना.

ज. आयएनएसटीएसकडून महसूल : वास्तविक नेटिंग ऑफ रिबेटनुसार.

च. उपलब्ध प्रोत्साहन : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार गणना.

**२.३ आर्थिक वर्ष २०१९-२० मधील महसुलातील तफावत/अतिरिक्त**

आर्थिक वर्ष २०१९-२० साठी महसुलातील तफावत/अतिरिक्त हे आयएनएसटीएसकडून मिळालेला महसूल आणि एकूण महसूल आवश्यकता (नक्त बिगर दर उत्पन्न आणि इतर व्यवसायातील उत्पन्न) यांची तुलना केल्यानंतरचे आहे.

**तक्ता क्र. २ : आर्थिक वर्ष २०१९-२० चा सारांश**

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **नियमित** | **प्रत्यक्षात** | **नक्त हक्क** |
|---|---|---|---|---|
| परिचलन आणि देखभाल खर्च | ६०.६६ | ७४.७४ | ६७.३० | ६९.७८ |
| भविष्य निर्वाह निधीवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा परिणाम | - | ०.२१ | ०.२१ | ०.२१ |

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **नियमित** | **प्रत्यक्षात** | **नक्त हक्क** |
|---|---|---|---|---|
| घसारा खर्च | ७४.५० | ७१.०२ | ७१.०२ | ७१.०२ |
| दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | ५०.४२ | ४८.७८ | ४८.७८ | ४८.७८ |
| वित्तपुरवठा शुल्क | - | ९.७२ | ९.७२ | ९.७२ |
| पुनर्वित्त पुरवठा शुल्क | - | ६.७८ | ६.७८ | ६.७८ |
| पुनर्वित्त लाभ हिस्सा | - | ०.८० | ०.८० | ०.८० |
| परकीय चलन दरातील तफावत | - | ०.२३ | ०.२३ | ०.२३ |
| कार्यरत भांडवलावर आणि सुरक्षा ठेवींवरील व्याज | ५.८३ | ६.०१ | ५.३१ | २.०० |
| प्राप्तीकर | ३३.०६ | १६.३८ | १६.३८ | १६.३८ |
| आकस्मिक राखीव योगदान | ४.०४ | ४.०४ | ४.०४ | ४.०४ |
| एकूण महसूल खर्च | **२२८.५१** | **२३८.७१** | **२३०.५८** | **२२९.७५** |
| समभाग भांडवलावरील परतावा | ८९.६० | ८८.४२ | ८८.४३ | ८८.४३ |
| एकूण महसूल आवश्यकता | **३१८.११** | **३२७.१४** | **३१९.००** | **३१८.१७** |
| उणे : बिगर दर उत्पन्न | ३.७७ | ४.८७ | ४.८७ | ४.८७ |
| अधिक : उपलब्धत प्रोत्साहन | - | २.३७ | २.३७ | २.३७ |
| अधिक : टीएसयुला देय त्वरित प्रोत्साहन रक्कम | - | ०.४० | ०.४० | ०.४० |
| पारेषण शुल्कातून एकूण महसूल आवश्यकता | **३१४.३४** | **३२५.०४** | **३१६.९१** | **३१६.०८** |
| पारेषण शुल्कातून महसूल | **३१८.४४** | **३१८.४८** | **३१८.४८** | **३१८.४८** |
| **महसूल तफावत - (अतिरिक्त)** | **(४.१०)** | **६.५६** | **(१.५७)** | **(२.४०)** |

अतिरिक्त महसूल एमवायटी आदेशात मंजूर झाला असून एमवायटी आदेशात मंजूर केलेली मूल्ये आणि अचूक समायोजनानंतरची मूल्ये यांच्यातील एआरआर घटकांमधील तफावतमुळे अचूक समायोजनानंतरचा अतिरिक्त महसूल आहे.

### ३ आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी अचूक समायोजन

अचूक समायोजनासाठी भांडवली खर्च, महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न संदर्भात एईएमएल-टी वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील तत्थ्य सादर करत आहे.

### ३.१ भांडवली खर्च आणि भांडवल

भांडवली खर्च आणि भांडवल पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता क्र. ३ : आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील भांडवल**

| तपशील / (रु. कोटी) | आयडीसीसह भांडवल (एमवायटी आदेश) | आयडीसीसह भांडवल (प्रत्यक्ष) |
|---|---|---|
| डीपीआर | १८९.०९ | २०८.४४ |
| बिगर डीपीआर | ३२.७८ | ३४.२५ |
| एकूण | २२१.८७ | २४२.६९ |

**तक्ता क्र. ४ : आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील भांडवल**

| तपशील / (रु. कोटी) | आयडीसीसह भांडवल (एमवायटी आदेश) | आयडीसीसह भांडवल (प्रत्यक्ष) |
|---|---|---|
| डीपीआर | - | २७.२७ |
| बिगर डीपीआर | - | ११.४३ |
| एकूण | **५३.५४** | **३८.७०** |

### ३.२ आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता एआरआर निर्धारणासाठी मानक

अ. घसारा : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ब. भांडवली कर्जावरील व्याज : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार, वास्तविक कर्ज पोर्टफोलिओच्या आधारे भारित सरासरी व्याजदर आणि चक्रवाढ व्याजदर हा विचारात घेतलेल्या वर्षादरम्यानचा आहे.

क. समभागावरील परतावा : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार गणना.

ड. परिचलन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार, नियामक खर्च आणि त्यावर मिळणाऱ्या निव्वळ हक्काच्या तुलनेत वास्तविक खर्च.

इ. कार्यरत भांडवलावरील व्याज (आयओडब्ल्युसी) : वास्तविक व्याजाची तुलना ही मानक व्याज (नियमित खेळते भांडवल आणि एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार व्याज दर विचारात घेऊन) आणि त्यावर मिळणाऱ्या निव्वळ हक्काशी केली जाते.

फ. आकस्मिक राखीव योगदान : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ग. बिगर दर उत्पन्न (एनटीआय) : वास्तविकतेनुसार - तथापि - याचिकेत तपशीलवार नमूद केले त्याप्रमाणे काही घटक मानले गेले नाहीत.

ह. इतर व्यवसायातील उत्पन्न : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ज. आयएनएसटीएसतून मिळणारा महसूल : वास्तविक नेटिंग ऑफ रिबेटनुसार.

च. उपलब्ध प्रोत्साहन : एमवायटी नियमन, २०१५ च्या तरतुदींनुसार गणना.

**३.३ आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता महसूल तफावत/अतिरिक्त**

आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी महसुलातील तफावत/अतिरिक्त ही आयएनएसटीएसकडून मिळालेला महसूल आणि एकूण आवश्यक महसूल (नक्त बिगर शुल्क उत्पन्न आणि इतर व्यवसायातील उत्पन्न) यांची तुलना केल्यानंतरची आहे.

**तक्ता क्र. ५ : आर्थिक वर्ष २०२०-२१ अचूक समायोजनाचा सारांश**

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **नियमित** | **प्रत्यक्ष** | **नक्त हक्क** |
|---|---|---|---|---|
| परिचलन आणि देखभाल खर्च | ५०.३६ | ६२.९८ | ५९.८३ | ६०.८८ |
| भविष्य निधीवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा परिणाम | - | ०.१८ | ०.१८ | ०.१८ |
| घसारा खर्च | ९३.१० | ८८.३३ | ८८.३३ | ८८.३३ |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ६०.९३ | ५३.३१ | ५३.३१ | ५३.३१ |
| वित्तपुरवठा शुल्क | - | ४.३२ | ४.३२ | ४.३२ |
| परकीय चलन दरातील फरक | - | ०.२७ | ०.२७ | ०.२७ |
| कार्यरत भांडवलावर आणि सुरक्षा ठेवींवरील व्याज | ६.०४ | ५.४७ | ७.७७ | ७.७७ |
| आकस्मिक राखीव योगदान | ४.९१ | ४.७८ | ४.७८ | ४.७८ |
| एकूण महसूल खर्च | **२१५.३४** | **२१९.६४** | **२१८.७९** | **२१९.८४** |
| समभाग भांडवलावरील परतावा | ११२.५९ | १२२.३८ | १२२.३८ | १२२.३८ |
| एकूण महसूल आवश्यकता | **३२७.९२** | **३४२.०३** | **३४१.१७** | **३४२.२२** |
| उणे : बिगर शुल्क उत्पन्न | २.८१ | ६.३० | ६.३० | ६.३० |
| अधिक : टीएसयुसाठीचे त्वरित प्रोत्साहनपर देय वेतन | - | ०.३८ | ०.३८ | ०.३८ |
| पारेषण दरातील एकूण महसूल आवश्यकता | **३२५.११** | **३३६.११** | **३३५.२५** | **३३६.३०** |

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **नियमित** | **प्रत्यक्ष** | **नक्त हक्क** |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१७-१८ महसुलातील तफावत/(अतिरिक्त) - वाढीव | २.०६ | २.०६ | २.०६ | २.०६ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी वहन/(धारण) खर्च | (२.५८) | (२.५८) | (२.५८) | (२.५८) |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ महसुलातील तफावत/(अतिरिक्त) | (२.२९) | (२.२९) | (२.२९) | (२.२९) |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी वहन / (धारण) खर्च | (०.८८) | (०.८८) | (०.८८) | (०.८८) |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ - (धारण) खर्चासह पुनरावलोकन याचिकेचा प्रभाव | (१.७५) | (१.७५) | (१.७५) | (१.७५) |
| आर्थिक वर्ष २०१९-२० महसुलातील तफावत/(अतिरिक्त) | (४.११) | (४.११) | (४.११) | (४.११) |
| निव्वळ एआरआर | **३१५.५६** | **३२६.५६** | **३२५.७०** | **३२६.७५** |
| पारेषण शुल्कातून मिळणारा महसूल | **३१५.५७** | **३१५.६१** | **३१५.६१** | **३१५.६१** |
| महसुलातील तफावत/(अतिरिक्त) | **-** | **१०.९५** | **१०.१०** | **११.१५** |

**तक्ता क्र. ६ : आर्थिक वर्ष २०२१-२२ चा सारांश**

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **नियमित** | **प्रत्यक्ष** | **नक्त हक्क** |
|---|---|---|---|---|
| परिचलन आणि देखभाल खर्च | ५१.७१ | ६४.२८ | ५९.१८ | ६०.८८ |
| भविष्य निर्वाहावरील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा परिणाम | - | ०.१५ | ०.१५ | ०.१५ |
| घसारा खर्च | ९९.६० | ९७.८८ | ९७.८८ | ९७.८८ |
| दीर्घकालीन भांडवलावरील व्याज | ६०.९३ | ५४.८० | ५४.८० | ५४.८० |
| वित्त पुरवठा शुल्क | - | ३.५३ | ३.५३ | ३.५३ |
| पुनर्वित्त पुरवठा शुल्क | - | ४.०० | ४.०० | ४.०० |
| व्याजदर बचतीचे पीव्ही | - | १.६१ | १.६१ | १.६१ |
| परकीय चलन दर बदल | - | ०.१० | ०.१० | ०.१० |
| कार्यरत भांडवल आणि सुरक्षित ठेववरील व्याज | ६.५५ | ५.८९ | ७.७३ | ६.५१ |
| आकस्मिक राखीव योगदान | ५.४६ | ५.३८ | ५.३८ | ५.३८ |
| एकूण महसूल खर्च | **२२४.२५** | **२३७.६२** | **२३४.३६** | **२३४.८४** |

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **नियमित** | **प्रत्यक्ष** | **नक्त हक्क** |
|---|---|---|---|---|
| समभाग भांडवलावरील परतावा | ११९.५९ | १६३.२७ | १६३.२७ | १६३.२७ |
| एकूण आवश्यक महसूल | **३४३.८४** | **४००.८९** | **३९७.६३** | **३९८.१०** |
| उणे - बिगर दर उत्पन्न | ४.४८ | ६.११ | ६.११ | ६.११ |
| अधिक - टीएसयुकरिता त्वरित प्रोत्साहनपर देय रक्कम | - | ०.४२ | ०.४२ | ०.४२ |
| नक्त एआरआर | **३३९.३६** | **३९५.२०** | **३९१.९४** | **३९२.४१** |
| पारेषण दरातून मिळणारा महसूल | ३३९.३६ | ३३९.३६ | ३३९.३६ | ३३९.३६ |
| महसुल तफावत/ (अतिरिक्त) | **-** | **५५.८४** | **५२.५८** | **५३.०५** |

आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील महसुलातील तफावत ही मुख्यत्वे अचूक समायोजनप्रसंगी वाढत्या आरओईमुळे आहे.

**४. आर्थिक वर्ष २०२२-२३ चे हंगामी अचूक समायोजन**

भांडवली खर्च, महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न संदर्भासह एईएमएल-टी आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी प्रत्यक्ष तरतूद सादर करत आहे.

**४.१ आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी भांडवली गुंतवणूक आराखडा आणि भांडवल**

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अंदाजित भांडवल आणि भांडवल पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता क्र. ७ : आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अंदाजित भांडवल आणि भांडवल**

| **तपशील / (रु. कोटी)** | **आयडीसीसह भांडवल (एमवायटी आदेश)** | **भांडवली खर्च (अंदाजे)** | **आयडीसीसह भांडवल (अंदाजे)** |
|---|---|---|---|
| डीपीआर | - | ४१५.४५ | १.२८ |
| बिगर डीपीआर योजना | - | १५.१८ | १०.२६ |
| **एकूण** | **५३.५४** | **४३०.६३** | **११.५४** |

**४.२ आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता एआरआर निश्चितीसाठीचे मानक**

अ. घसारा : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ब. भांडवली कर्जावरील व्याज : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार, वास्तविक कर्ज पोर्टफोलिओच्या आधारे भारित सरासरी व्याजदर आणि चक्रवाढ व्याजदर हा विचारात घेतलेल्या वर्षादरम्यानचा आहे.

क. समभागावरील परतावा : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ड. परिचलन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार, नियामक खर्च आणि त्यावर मिळणाऱ्या निव्वळ हक्काच्या तुलनेत वास्तविक खर्च.

इ. कार्यरत भांडवलावरील व्याज (आयओडब्ल्युसी) : वास्तविक व्याजाची तुलना ही मानक व्याज (नियमित खेळते भांडवल आणि एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार व्याज दर विचारात घेऊन) आणि त्यावर मिळणाऱ्या निव्वळ हक्काशी केली जाते.

फ. आकस्मिक राखीव योगदान : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ग. बिगर दर उत्पन्न (एनटीआय) : वास्तविकतेनुसार - तथापि - याचिकेत तपशीलवार नमूद केले त्याप्रमाणे काही घटक मानले गेले नाहीत.

ह. इतर व्यवसायातील उत्पन्न : एमवायटी नियमन, २०१९ च्या तरतुदींनुसार गणना.

ई. आयएनएसटीएसतून मिळणारा महसूल : वास्तविक नेटिंग ऑफ रिबेटनुसार.

**४.३ आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील महसूल तफावत/अतिरिक्त**

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी हंगामी अचूक समायोजनाचा सारांश पुढे नमूद केला आहे :

**तक्ता क्र. ८ : आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी हंगामी अचूक समायोजनाचा सारांश**

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **अंदाजे** |
|---|---|---|
| परिचलन आणि देखभाल खर्च | ५३.६६ | ६६.४१ |
| भविष्य निर्वाह निधीवर होणार सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा परिणाम | - | ०.१५ |
| घसारा खर्च | १०१.२१ | ९९.०१ |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ५५.२४ | ४७.९८ |
| कार्यरत भांडवलावरील आणि सुरक्षा ठेवींवरील व्याज | ६.६२ | ६.६१ |
| आकस्मिक राखीव योगदान | ५.६० | ५.४७ |
| एकूण महसूल खर्च | **२२२.३३** | **२२५.६४** |
| समभाग भांडवलावरील परतावा | १२२.३२ | ११८.७३ |
| एकूण महसूल आवश्यकता | **३४४.६५** | **३४४.३७** |
| उणे : बिगर शुल्क उत्पन्न | ४.८६ | ३.९८ |

| तपशील (रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **अंदाजे** |
|---|---|---|
| नक्त एआरआर | **३३९.७९** | **३४०.४०** |
| पारेषण शुल्कातून मिळणारा महसूल | ३३९.७७ | ३३९.७७ |
| महसुलातील अंतर/(अतिरिक्त) | **-** | **०.६३** |

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी महसुलातील तफावत ही मुख्यत्वे एमवायटी आदेशामध्ये मंजूर केलेले मूल्य आणि अचूक समायोजनानंतरच्या मूल्य यातील भिन्न एआरआर घटकांममुळे आहे.

### ५. आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत संचयी महसूल तफावत/अतिरिक्त

आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंतची संचयी महसुलातील तफावत/(अतिरिक्त) पुढील तक्त्यामध्ये दर्शविली आहे :

**तक्ता क्र. ९ : वहन/धारण खर्चासह आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत मागील तफावत/अतिरिक्त**

| तपशील | **रु. कोटी** |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१९-२० महसुलातील तफावत/(अतिरिक्त) - वाढीव | १.७१ |
| आर्थिक वर्ष २०१९-२० साठी वहन/(धारण) खर्च | (०.६१) |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ महसुलातील तफावत/(अतिरिक्त) | ११.१५ |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी वहन/(धारण) खर्च | ३.०१ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ महसुलातील तफावत/(अतिरिक्त) | ५३.०५ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी वहन/(धारण) खर्च | ९.७७ |
| आर्थिक वर्ष २०२२-२३ महसुलातील तफावत/(अतिरिक्त) | ०.६३ |
| आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत एकूण अंतर/(अतिरिक्त) | **७८.७०** |

### ६. आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित एकूण महसुली गरज

एमवायटी नियमन, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एईएमएल-टी ने सुधारित एआरआर अंदाज सादर केले आहेत.

#### ६.१ भांडवली खर्च आणि भांडवल

माननीय आयोगाने दि ३०.०३.२०२० च्या आदेशान्वये आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी तात्पुरत्या आधारावर रु.५३.५४ कोटींचे भांडवल मंजूर केले होते. आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित भांडवली खर्च आणि भांडवल पुढील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे :

**तक्ता क्र. १० : आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित खर्च आणि भांडवल**

| तपशील / (रु. कोटी) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (प्रस्तावित) | | आर्थिक वर्ष २०२४-२५ (प्रस्तावित) | |
|---|---|---|---|---|
| | भांडवली खर्च | आयडीसीसह भांडवल | भांडवली खर्च | भांडवली खर्च |
| डीपीआर | १४०८.२ | ९६ | १४३४.६९ | १३६७.९६ |
| बिगर डीपीआर योजना | २५.०० | ३०.९८ | २०.०० | २०.५३ |
| एकूण | **१४३३.२०** | **१२६.९८** | **१४५४.६९** | **१३८८.४९** |

**६.२ आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित एआरआर**

आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित एआरआर पुढील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे :

**तक्ता क्र. ११ : आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अंदाजित एआरआर**

| तपशील (रु. कोटी) | **आर्थिक वर्ष २०२३-२४ (एमवायटी आदेश)** | **आर्थिक वर्ष २०२३-२४ (अंदाजित)** | **आर्थिक वर्ष २०२४-२५ (एमवायटी आदेश)** | **आर्थिक वर्ष २०२४-२५ (अंदाजित)** |
|---|---|---|---|---|
| परिचलन आणि देखभाल खर्च | ५५.७३ | ६८.१२ | ५७.८७ | ७१.७३ |
| भविष्य निर्वाह निधीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा परिणाम | - | ०.१५ | - | ०.१५ |
| घसारा खर्च | १०३.७१ | १०२.२२ | १०१.६८ | १३७.६७ |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ४९.३५ | ४३.६४ | ४३.४५ | ७७.८७ |
| कार्यरत भांडवलावर आणि सुरक्षा ठेवींवरील व्याज | ६.७० | ७.६३ | ६.७३ | ८.१८ |
| आकस्मिक राखीव योगदान | ५.७३ | ५.५० | ५.८७ | ५.८२ |
| एकूण महसूल खर्च | **२२१.२२** | **२२७.२५** | **२१५.६०** | **३०१.४२** |
| समभाग भांडवलावरील परतावा | १२५.०४ | १२२.२६ | १२७.७७ | १६०.८२ |

| तपशील (रु. कोटी) | **आर्थिक वर्ष २०२३-२४ (एमवायटी आदेश)** | **आर्थिक वर्ष २०२३-२४ (अंदाजित)** | **आर्थिक वर्ष २०२४-२५ (एमवायटी आदेश)** | **आर्थिक वर्ष २०२४-२५ (अंदाजित)** |
|---|---|---|---|---|
| एकूण आवश्यक महसूल | **३४६.२७** | **३४९.५१** | **३४३.३७** | **४६२.२४** |
| उणे : बिगर शुल्क उत्पन्न | ५.२५ | ३.९८ | ५.६५ | ३.९८ |
| नक्त एआरआर | **३४१.०२** | **३४५.५३** | **३३७.७२** | **४५८.२६** |
| आर्थिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची वहन खर्चासह मागील तफावत | - | ७८.७० | - | - |
| एकूण एआरआर | **३४१.०२** | **४२४.२३** | **३३७.७२** | **४५८.२६** |

आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी एआरआरमधील तफावत ही प्रामुख्याने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये - आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंतच्या यापूर्वीच्या पुनर्प्राप्तीमुळे आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एआरआरमधील तफावत ही मुख्यत आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता एमवायटी आदेशात मंजूर भांडवलाच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये अधिक भांडवल अपेक्षित केल्यामुळे आहे.

७ **प्रार्थना**

माननीय आयोगास पुढील म्हणणे मान्य व्हावे अशी एईएमएल - टी विनंती करते :

१. यादवारे सादर केल्याप्रमाणे याचिका स्वीकारावी;

२. आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या अचूक समायोजनाने वहन/धारण खर्चासहची प्रत्यक्ष महसुलातील तफावत/अतिरिक्त या याचिकेत नमूद केल्याप्रमाणे मंजूर करावी;

३. या याचिकेत नमूद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरती एआरआर आणि महसूल अंतर/अतिरिक्त मंजूर करावे;

४. या याचिकेत अंदाजित केल्याप्रमाणे, नियंत्रण कालावधीच्या चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एआरआर मंजूर करावे;

५. एमवायटी नियमन, २०१५ तसेच एमवायटी नियमन २०१९ मधून विशिष्ट विचलनास याचिकेत आवश्यक वाटल्यास परवानगी द्यावी.

६. पूर्वीच्या शुल्काबाबतच्या आदेशात केलेल्या निर्णयांचा पुनर्विचार/शिथिलतेबाबत या याचिकेत केली असल्यास विशिष्ट प्रार्थना मंजूर करावी.

७. याचिकेत भर / फेरफार / बदल / फेरबदल करण्यास भविष्यातील तारखेस अनुमती द्यावी;

८. याचिकेत नमूद केलेल्या वा अनवधानाने उल्लेख झालेल्या कोणत्याही चुका/ विसंगती/ वगळणे/ फरक आदींसाठी क्षमा करावी.

९. आयोगाला जारी करण्यास योग्य वाटेल अशी कोणतीही इतर सवलत वा आदेश तसेच निर्देश द्यावेत.

किशोर पाटील

मुंबई

प्रतिनिधी

२१ डिसेंबर २०२२

अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.